PATODA SANCHAR

# पाटोदा संचार



नाद करायचा नाय,
मतदार जागा हाय!
आमदाराच्या अख्खा
कुटुंबाला घरी पाठवलं,
घराणेशाहीला साफ
नाकारलं

पान तीन वर

संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे | संपादक-विलास डोळसे | E-mail-pat.sanchar@gmail.com

❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २० वे ❑ अंक २७६ वा ❑ सोमवार दि.२२ डिसेंबर २०२५ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 20 th ❑ Issu -276 ❑ Monday 22 December 2025 ❑ Page- 4 Price- Rs.1.❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359


# बीडमध्ये क्षीरसागरांना धक्का; राष्ट्रवादीच्या प्रेमलता पारवे नगराध्यक्षपदी

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत आजपर्यंतचा सर्वात मोठा राजकीय चमत्कार पाहायला मिळाला आहे. मागील अनेक वर्षांपासून नगरपालिकेवर असलेली क्षीरसागर घराण्याची एकहाती सत्ता बीडच्या मतदारांनी दूर सारली.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) उमेदवार प्रेमलता पारवे यांनी ३,७७९ मतांनी विजय मिळवत नगराध्यक्ष पदावर नाव कोरले. क्षीरसागर घराण्याने ठरवलेल्या उमेदवारा व्यतिरिक्त नगराध्यक्ष झाल्याने ऐनवेळी भाजपत गेलेले डॉ. योगेश क्षीरसागर आणि राष्ट्रवादीचे ( शप) आमदार संदीप क्षीरसागर या दोन्ही बंधूंना हा मोठा धक्का मानला जात आहे.

या निवडणुकीत शेवटच्या क्षणापर्यंत श्वास रोखून धरणारा थरार



पाहायला मिळाला. दहाव्या फेरीपर्यंत भाजपच्या डॉ. ज्योती घुम्रे यांनी आघाडी घेतली होती, मात्र शेवटच्या टप्प्यात प्रेमलता पारवे यांनी मुसंडी मारली. पारवे यांना ३५,८१२ मते मिळाली, तर डॉ. ज्योती घुम्रे ३५,०३३ मतांवर अडकल्या. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या स्मिता वाघमारे यांना २५,४४० मतांवर समाधान मानावे लागले.

**क्षीरसागर बंधूंना दणका**

**नगरसेवक पदाचे पक्षनिहाय बलाबल (एकूण ५० जागा):**

राष्ट्रवादी (अजित पवार गट): १८
भाजप: १४
राष्ट्रवादी (शरद पवार गट): ११
शिवसेना (शिंदे गट): ०३
शिवसेना (ठाकरे गट): ०१
एमआयएम: ०२
काँग्रेस: ०१

डॉ. भारतभूषण क्षीरसागर आणि डॉ. योगेश क्षीरसागर यांची नगरपालिकेतील मक्तेदारी संपवण्यासाठी बीडकरांनी यावेळी परिवर्तनाचा पवित्रा घेतला होता. डॉ. योगेश क्षीरसागर यांनी भाजपमध्ये प्रवेश करून 'संजीवनी' मिळवण्याचा प्रयत्न केला, मात्र मतदारांनी त्यांना नाकारले. दुसरीकडे, आमदार संदीप क्षीरसागर यांनी पूर्ण ताकद लावूनही त्यांची यंत्रणा कमी पडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

## धनंजय मुंडेंनी परळीचा गड राखला; पद्मश्री धर्माधिकारी नगराध्यक्षपदी, दीपक देशमुखांसह पत्नीचा पराभव

परळी । प्रतिनिधी

राज्यभरातील २८७ नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचे निकाल लागले. या निवडणुकीत भाजपने सर्वाधिक ठिकाणी सत्ता काबीज केली, तर दुसऱ्या अन् तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे शिवसेना(शिंदे) आणि राष्ट्रवादी(अप) पक्षाने विजय मिळवला.

या निवडणुकीत अनेक मात्तबर नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. माजी मंत्री आणि आमदार धनंजय मुंडे यांच्यासाठीही ही निवडणूक अंत्यत महत्वाची होती. अखेर त्यांना आपला परळीचा गड



**नगराध्यक्षपदाचा निकाल**

पद्मश्री धर्माधिकारी (घड्याळ) - २८,०९१ मते
संध्या देशमुख (तुतारी) - १२,४२९ मते
सय्यद मैमुना हनीफ (पंजा) - ८,५५२ मते

राखण्यात यश आले.

वाल्मिक कराड प्रकरणामुळे धनंजय मुंडे यांच्यावर सतत टीका सुरू होती. तसेच, निवडणुकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी परळीत तब्बल आठ दिवस तळ ठोकत प्रचार सभा, फेऱ्या काढून वातावरण ढवळून काढले होते. यामुळे संपूर्ण राज्याचे लक्ष परळीच्या निकालाकडे लागून होते. अशा परिस्थितीत, धनंजय मुंडे यांनी परळीत विविध ठिकाणी प्रचारसभा आणि कॉर्नर बैठका घेत महायुतीचा जोरदार प्रचार केला होता. यामुळेच

पान दोन वर

## माजलगावात नगराध्यक्षपदी महरीन चाऊस आमदार प्रकाश सोळंकेंचा उमेदवार तीन नंबरवर

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगरपालिकेची निवडणूकीपुर्वी विकासाचा गाजावाजा करणाऱ्या येथील आमदार प्रकाश सोळंके यांच्या उमेदवाराला मतदारांनी तीन नंबर वर पाठवत मोठा उलटफेर केला. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटामध्ये एकीचे प्रदर्शन दिसून आल्याने माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस यांच्या सून महरीन शिफा बिलाल चाऊस यांनी अडीच हजार मतांनी दणदणीत विजय प्राप्त करत नगराध्यक्ष पद पटकावले.

यापूर्वी नगरपालिकेच्या अनेक निवडणुकीत भाजप, शिवसेना यांचा बालेकिल्ला समजला जात होता. भाजपाचे उमेदवार संध्या ज्ञानेश्वर मेंडके या जातीय समीकरणात विजय होतील असे दिसत होते. परंतु येथील भाजपामध्ये नेतृत्व करणारे कोणीच नसल्याने व राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी दुर्लक्ष केल्याने त्यांचा पराभव झाला. या निवडणुकीत प्रभाग चार मधून दीपक मेंडके हे भाजपच्या तिकिटावर निवडून जरी आले असले तरी हा त्यांचा विजय हा त्यांच्या स्वकर्तत्वावर असल्याचे बोलले जात होते. तर याच प्रभागातून दुसऱ्या जागेवर त्यांच्या पत्नी रेश्मा मेंडके यांचा देखील विजय झाला. भाजप शिवसेनेच्या दोन्ही गटाच्या जवळपास अनेक उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाल्याचे दिसून आले. यामुळे भाजप व दोन्ही शिवसेनेचा सुपडा साफ झाल्याचे दिसून आले.

मागील अनेक वर्षापासून विकासाचा गाजावाजा करणारे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आ. प्रकाश सोळंके यांनी शहराच्या विकासासाठी २०० ते ३००कोटी पेक्षा जास्त निधी आणला. मात्र, असला तरी शहरात झालेली कामे ही अतिशय निकृष्ट होत असताना आमदार सोळंके यांनी याबाबत भ्र शब्द देखील वापरला नसल्याने भ्रष्टाचाराला त्यांचे प्रोत्साहन दिसून आले. शहराच्या विकासासाठी आलेले करोडो रुपयांचा निधी पाण्यात गेल्यामुळे मतदारांनी त्यांच्या उमेदवाराला तीन नंबरवर पाठवले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून महरीन शिफा बिलाल चाऊस यांना तिकीट दिले होते . या निवडणुकीत यांच्या प्रचाराची धुरा बहुजन विकास मोर्चाचे बाबुराव पोटभरे यांनी उचलली होती. त्याचबरोबर मोहन जगताप, नारायण डक, सहाल चाऊस यांनी एकी दाखवल्याने त्यांचा विजय सुकर होऊ शकला. त्यामुळे सहाल चाऊस यांच्या सून नगराध्यक्ष पदावर

पान दोन वर

## ७५ टक्के नगराध्यक्ष महायुतीचे, ४८ टक्के नगरसेवक एकट्या भाजपाचे; एवढा मोठा विजय..., फडणवीसांनी आकड्यांसह सांगितली ताकद

**नागपूर । प्रतिनिधी**

मी यापूर्वीच भाकीत केले होते की, एकूण जे काही नगराध्यक्ष निवडून येतील त्यांपैकी ७५ टक्के हे महायुतीचे निवडून येतील. त्याच पद्धतीचा कौल जनतेने दिला आहे. विशेतः भारतीय जनता पक्ष हाच पहिल्या क्रमांकाचा पक्ष आहे, हे देखील पुन्हा एकदा अधोरेखित झाले, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.



तसेच, गेल्या २०-२५ वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहास एवढा मोठा विजय कुणालाच मिळालेला नाही. जो आज भाजपा आणि महायुतीला मिळाला आहे, असा दावाही त्यांनी यावेळी केला. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

फडणवीस म्हणाले, आतापर्यंत आलेल्या निकालानुसार, जवळपास १२९ नगराध्यक्ष हे भारतीय जनता पक्षाचे निवडून आले आहेत. आपण बघितले तर, आम्हा तिघांचे मिळून जवळपास ७५ टक्के नगराध्यक्ष आहेत. तसेच नगरसेवकांचा विचार केल्यास भारतीय जनता पक्षाने नवा विक्रमच नोंदवला आहे. २०१७ साली आम्ही क्रमांक एकचा पक्ष होतो, त्यावेळी आमचे (भाजपा) १६०२ नगरसेवक होते. आता त्याच्या दुपटीहूनहीअधिक ३३२५ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे, एकूण नगरसेवकांच्या तुलनेत ४८ टक्के एवढे एकट्या भाजपचे निवडून आले आहेत. अर्थात प्रचंड मोठं जनसमर्थन आम्हाला मिळाले आहे.

विशेषतः आमचे सहकारी एकनाथराव शिंदे आणि अजित पवार यांचेही मी अभिनंद करतो. त्यांच्याही पक्षाने अतिशच चांगला परफॉर्मन्स दिला आहे. एक प्रकारे विधानसभेचा परफॉर्मन्स आम्ही रिपिट केला आहे. पहिल्यांदाच आमचे अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात ही निडवणूक होत होती आणि या निवडणुकीत एक मोठं यश भारतीय जनता पक्षाला मिळालं या बद्दल मी रविंद्र चव्हाण यांचेही अभिनंदन करतो. हा एक अभूतपूर्व विजय मिळाला आहे. महत्वाचे म्हणजे, २०१७ पेक्षाही हा विजय मोठा आहे. गेल्या २०-२५ वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहास एवढा मोठा विजय कुणालाच मिळालेला नाही. जो आज भाजपा आणि महायुतीला मिळाला आहे, असेही पडणवीस म्हणाले.

फडणवीस पुढे म्हणाले, सर्वात महत्वाचे म्हणजे या निवडणुकीत मी अत्यंत सकारात्मक प्रचार केला. एकाही सभेत एकाही व्यक्तीच्या विरोधात अथवा पक्षाच्या विरोधात बोललो नाही, केवळ विकासावर मते मागीतली, आम्ही काय केले आणि काय करणार आहोत, हे सांगितले आणि त्याला सर्व मतदारांनी अतिशय चांगला प्रतिसाद दिला. ही भारताच्या

पान दोन वर

## धारूर नगरपरिषदेत भाजपाची पिछेहाट, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा 'दे धक्का'

धारूर । प्रतिनिधी

राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचे निकाल आज जाहीर होत आहेत. या निवडणुकीत भाजपा हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यातील धारूरमध्ये भाजपला अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने 'दे धक्का' दिला आहे.

धारूर नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजपचा पराभव झाला असून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची सरशी झली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे प्रकाश सोळंके यांनी येथे वर्चस्व मिळवले.

खरे तर, येथे भाजपा नेत्या पंकजा मुंडे आणि अजित दादांच्या राष्ट्रवादीचे प्रकाश सोळंके, असा राजकीय सामना रंगला होता. ही निवडणूक पंकजा मुंडेसांठी प्रतिष्ठेची मानली जात होती. मात्र, येथे भाजपला २० पैकी केवळ ६ जागा मिळाल्या. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ११ जागा आणि शरद पवार गटाला ३ जागा मिळाल्या आहेत. पंकजा मुंडे यांच्यासाठी हा धक्का मानला जात आहे.

## आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने कमीच जागा लढवल्या होत्या-उपमुख्यमंत्री अजित पवार

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला आहे. या निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळालं आहे. महायुतीत भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजपला जवळपास १२० जागांवर यश मिळालं आहे. तर शिवसेनेला जवळपास ६० जागांवर विजय



मिळाला आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला ३६ जागांवर समाधान मानावं लागलं आहे. या निकालावर अजित पवार यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तिसऱ्या नंबरला गेल्यामुळे पत्रकारांनी त्यांना याबाबत प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी आपली

पान दोन वर

## बीडमध्ये इतिहासात पहिल्यांदाच भाजपचे १५ नगरसेवक विजयी

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषद निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक यश संपादन करत शहराच्या राजकारणात आपली ताकद दाखवून दिली आहे. बीड नगरपरिषदेच्या एकूण ५२ जागांपैकी भाजपचे तब्बल १५ नगरसेवक विजयी झाले असून, बीडच्या इतिहासात प्रथमच भाजपने एवढ्या मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आणण्याची कामगिरी केली आहे. यापूर्वी भाजपचा केवळ एक नगरसेवक असायचा. यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांचा मात्र निसटता पराभव झाला.

नगराध्यक्ष पदासाठी भाजपच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांनी अत्यंत चुरशीची व अटीतटीची लढत दिली. मात्र, शेवटच्या टप्प्यात अतिशय कमी मतांनी त्यांचा निसटता पराभव झाला. या निवडणुकीत डॉ.घुंबरे यांना ३२ हजार ३३ मते मिळाली असून, हा वाढता जनाधार भाजपसाठी भविष्यात निश्चितच बळ देणारा आहे, असे पक्षाच्यावतीने सांगण्यात आले. बीड नगरपरिषदेची निवडणूक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप नेत्या, मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आली. ऐन निवडणुकीच्या तोंडावर डॉ.क्षीरसागर यांनी भाजपमध्ये प्रवेश करून निवडणुकीची जबाबदारी स्वीकारली होती. त्यांना खंबीर साथ देत जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह सर्वच पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी निवडणुकीत परिश्रम घेतले.

**भाजपचा पहिला मुस्लिम नगरसेवक सय्यद मुस्तफा; शुभम धूत सर्वाधिक मतांनी विजयी**

स्व.गोपीनाथराव मुंडे यांना मानणारे आणि भाजपचे नगरसेवक पदाचे उमेदवार मुस्तफा सय्यद यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला आहे. त्यांच्या रूपाने बीडमध्ये भाजपचा पहिला मुस्लिम नगरसेवक झाला. तसेच, शुभम धूत हे सर्वाधिक १५८४ मतांनी विजयी झाले आहेत.

**प्रचंड विरोधानंतरही डॉ.सारिकाताई क्षीरसागर विजयी**

बीडमधील प्रभाग क्र.१५ च्या उमेदवार डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांना विरोधकांनी प्रचंड विरोध केला. अक्षरशः विरोधक याच प्रभागामध्ये तळ ठोकून होते. तरीही डॉ.सारिकाताई ह्या ७९६ मतांनी विजयी झाल्या. त्यानंतर पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी क्षीरसागर निवासस्थानी गुलाल उधळून जल्लोष केला.

### माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही-डॉ.योगेश क्षीरसागर

बीडकरांनी निवडून दिलेल्या भाजपच्या विजयी १५ नगरसेवकांचे अभिनंदन करतो. आगामी काळात पक्षाचे संघटन वाढवून पुन्हा जनतेत जाऊ. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री पंकजाताई मुंडे यांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, पक्ष वाढीसाठी परिश्रम घेईल, असा शब्द डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिला.

**भाजपच्या विजयी नगरसेवकांची प्रभागनिहाय नावे**

प्रभाग क्र.२ मधून शुभम दिलीप धूत, सावित्री नितीन साखरे, ४ मधून मीनाताई जाधव, ५ मधून मीना रणजितसिंह चव्हाण, ७ मधून भाग्यश्री देशपांडे, जगदीश गुरखदे, ८ मधून राहुल गुरखुदे, १० मधून मंगेश धोंगडे, भाग्यश्री तांबारे, १२ मधून पूजा राजाभाऊ गुजर, १३ मधून समीक्षा शेटे, सय्यद मुस्तफा, १५ मधून डॉ.सारिका क्षीरसागर, आदित्य माने, २५ मधून ज्योती नंदकिशोर पिंगळे अशी भाजपच्या विजयी नगरसेवकांची नावे आहेत.

## अंबाजोगाई नगर परिषदेत परिवर्तनाची नांदी; नंदकिशोर मुंदडा नगराध्यक्षपदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई नगर परिषद निवडणुकीत भाजपा पुरस्कृत अंबाजोगाई शहर परिवर्तन जनविकास आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार नंदकिशोर शिवबगस मुंदडा हे २२ हजार ७७७ मतांचे मताधिक्य घेऊन विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार मोदी राजकिशोर कांताप्रसाद यांना २० हजार २८० मिळाले आहेत.





दोघांनीही आपली प्रतिष्ठा पणाला लावल्याचे शहरात दिसून आले. नंदकिशोर मुंदडा यांनी माझी शेवटची निवडणूक असल्याचे सांगत मतदारांना भावनिक साद दिली होती. तर राजकिशोर मोदी यांनी आपण मागील २५ वर्षात केलेल्या विकास कामावर मतदान मागितले. नंदकिशोर मुंदडा यांचे ११ नगरसेवक निवडणूक आले आहेत. राजकिशोर मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार व अजित पवार), आरपीआय, मनसे पूरस्कृत तयार केलेल्या लोकविकास महाआघाडीच्या ३१ नगरसेवकांपैकी २० नगरसेवक निवडून आले आहेत.

## विशेष वृत्त

### जी राम जी विधेयकावर राष्ट्रपतींकडून शिक्कामोर्तब

**नवी दिल्ली ।** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रविवारी जी राम जी विधेयकाला मान्यता दिली. त्यामुळे मोठे राजकीय वादंग उभे करणाऱ्या विधेयकाचे रूपांतर आता कायद्यात झाले आहे. नवा कायदा सुमारे २० वर्षे अस्तित्वात असलेल्या मनरेगाची जागा घेईल.

देशात याआधी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) आणि त्याच्याशी संबंधित योजना लागू होती. त्या कायद्याचे नाव आणि स्वरूप बदलणारे पाऊल मोदी सरकारने उचलले. त्यासाठी विकसित भारत गॅरंटी फॉर रोजगार ॅड आजीविका मिशन (ग्रामीण) म्हणजेच व्हीबी-जी राम जी विधेयक आणले गेले. त्या विधेयकाला नुकतीच संसदेने मंजुरी दिली. विरोधकांनी तीव्र आक्षेप घेतल्याने गोंधळातच विधेयक मार्गी लागले. त्यानंतरही विरोधकांनी आणि विशेषत: काँग्रेसने आक्रमक पवित्रा कायम ठेवला आहे. सरकारने मनरेगावर बुलडोझर चालवला.

मनरेगा योजना उद्धवस्त करणारे पाऊल ग्रामीण जनतेच्या हिताचे नाही, अशी भूमिका विरोधकांनी घेतली आहे. त्यांच्याकडून महात्मा गांधी यांचे नाव हटवण्यावरूनही तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. मनरेगानुसार ग्रामीण कुटूंबांना दरवर्षी १०० दिवसांच्या रोजगाराची हमी मिळायची. नव्या कायद्यामुळे ती मर्यादा वाढून १२५ दिवस इतकी करण्यात आली आहे. त्याकडे सत्ताधारी लक्ष वेधत आहेत.

### मुंबई महापालिकेत काँग्रेस अन् वंचित बहुजन आघाडीची युती होणार?


**मुंबई ।** आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या एका शिष्टमंडळाने रविवारी वंचित बहुजन आघाडीचे (वंचित बहुजन आघाडी) प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली, असे काँग्रेसच्या एका नेत्याने सांगितले.

या शिष्टमंडळाचे नेतृत्व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे मुंबई प्रभारी यू.बी. व्यंकटेश यांनी केले.

या बैठकीत नागरी प्रशासन, प्रमुख शहरी आव्हाने आणि मुंबईच्या जनतेची खऱ्या अर्थाने सेवा करणाऱ्या सर्वसमावेशक विकासाच्या गरजेवर विचारविनिमय झाला, असे शहर युनिट प्रमुख वर्षा गायकवाड यांनी एका निवेदनात म्हटले आहे. या संवादामुळे आगामी काळात विधायक संवाद आणि लोकशाही सहभागाचे महत्त्व अधोरेखित झाले, असेही त्या म्हणाल्या.

### माजी मंत्री शालिनीताई पाटील यांचे निधन

मुंबई । काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी मंत्री शालिनीताई पाटील यांचे शनिवारी (२० डिसेंबर) निधन झाले आहे.



वयाच्या ९४व्या वर्षी त्यांनी मुंबईतील माहीम येथील राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला.

गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी असल्याची माहिती समोर आली आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतदादा पाटील यांच्या पत्नी असलेल्या शालिनीताई यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या निधनाने राज्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

## संपादकीय...

### महायुतीची ताकद कायम

विधानसभा निवडणुकीला वर्ष उलटून गेले असले तरी महाराष्ट्राच्या राजकारणातील सत्तासमीकरणे फारशी बदललेली नाहीत, हे अलीकडील नगराध्यक्षपदाच्या निकालांनी स्पष्ट केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुका अनेकदा केवळ स्थानिक प्रश्नांपुरत्या मर्यादित असतात, असे मानले जाते. मात्र यावेळी आलेल्या निकालांमध्ये विधानसभेतील मतदानाचा पॅटर्न ठळकपणे पुन्हा दिसून आला आणि त्यामुळे महायुतीची ताकद अजूनही कायम असल्याचे अधोरेखित झाले.

राज्यात गेल्या चार वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक झाली नव्हती. त्यामुळे सर्वाना या निवडणुकीची उत्सुकता लागली होती. जवळपास चार वर्षानंतर प्रथमच राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीला मुहूर्त लागला. त्यानंतर पहिल्या टप्प्यात राज्यातील २४६ नगरपालिका व ४२ नगरपंचायतीसाठी निवडणूक पार पडली. या निवडणुकीची मतमोजणी रविवारी पार पडली. त्यामध्ये महायुतीने पुन्हा एकदा वर्चस्व प्राप्त केले आहे.

राज्यात २८८ पैकी सर्वाधिक १२४ नगराध्यक्ष भाजपचे निवडून आले आहेत. त्यासोबतच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ६१ तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ३६ नगराध्यक्ष विजयी झाले आहेत. तर महाविकास आघाडीतील काँग्रेसचे २७ तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे ८ तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे १२ नगराध्यक्ष निवडून आले आहेत. त्यासोबतच या निवडणुकीत स्थानिक विकास आघाडी व अपक्ष असे मिळून २० नगराध्यक्ष विजयी झाले आहेत.

महायुतीमधील भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मिळून २२१ तर महाविकास आघाडीचे ४७ तर इतर २० नगराध्यक्ष विजयी झाले आहेत. हा महायुतीचा पॅटर्न पहिला तर राज्यातील विधानसभा निवडणुकीला वर्ष उलटले असले तरी यावेळी विधानसभेच्या २८८ जागासाठी झालेल्या निवडणुकीत महायुतीमधील भाजपचे १३२, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ५७ तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ४१असे एकूण २३४आमदार महायुतीचे निवडून आले होते.

महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे २०, काँग्रेसचे १६ तर तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे १० असे एकूण ४६ आमदार निवडून आले होते. एकंदरीत ही आकडेवारी पहिली तर विधानसभा व नगराध्यक्षपदाची निवडणूक पाहता वर्षभरानंतरही महायुतीची ताकद कायम असल्याचे स्पष्ट होत आहे. वर्षभरानंतर झालेल्या या निवडणुकीतील यश पाहता या दोन निवडणुकीच्या निकालात फारसा फरक वाटत नाही.

महायुतीला विधानसभेत मिळालेले यश हे केवळ तत्कालीन वातावरणाचे फलित नव्हते, तर संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांचे जाळे आणि मतदारांशी असलेला थेट संपर्क याचा परिणाम होता, हे नगराध्यक्षपदाच्या निकालांनी पुन्हा सिद्ध केले. ज्या भागांमध्ये विधानसभेला महायुतीला मताधिक्य मिळाले होते, त्याच भागांमध्ये स्थानिक निवडणुकांतही महायुतीचे उमेदवार सरस ठरले. यामुळे मत ट्रान्स्फर आणि युतीतील घटक पक्षांमधील समन्वय अजूनही मजबूत असल्याचे चित्र समोर आले आहे.

या निकालांमधून विरोधकांसाठी मात्र चिंतेचा संदेश जातो. सत्ता-विरोधी लाट उभी राहील, अशी अपेक्षा होती; परंतु ती मर्यादित स्वरूपातच दिसून आली. स्थानिक प्रश्न, नाराजी किंवा नेतृत्वावरील असमाधान याचा मोठा फटका सत्ताधाऱ्यांना बसलेला नाही. याउलट, महायुतीने स्थानिक पातळीवरही आपली पकड टिकवून ठेवली आहे.

# गुरु गोविंद सिंह यांचे सामाजिक कार्य



भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की, ज्यांचे कार्य केवळ धार्मिक चौकटीत मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनाच्या व्यापक प्रवाहाला दिशा देणारे ठरते. अशाच महान विभूतींपैकी एक म्हणजे गुरु गोविंद सिंह होय. शीख धर्माचे दहावे गुरु म्हणून त्यांची ओळख असली, तरी त्यांचे कार्य हे केवळ धर्मगुरुपदापुरते सीमित नव्हते. ते एक समाजसुधारक, न्यायासाठी लढणारे योद्धा, मानवी मूल्यांचे तत्त्वज्ञ आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य देणारे नेतृत्व होते. त्यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या सामाजिक कार्याचा वेध घेणे म्हणजे भारतीय समाजातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या संघर्षाचा इतिहास समजून घेणे होय.

गुरु गोविंद सिंह यांचा काळ हा सामाजिक, धार्मिक आणि राजकीय अस्थैर्याचा होता. समाज जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, धार्मिक असहिष्णुता आणि सत्ताधारी वर्गाच्या अन्यायाने ग्रासलेला होता. सामान्य माणूस भयभीत जीवन जगत होता. धर्माचा वापर माणसामाणसांतील भेद वाढवण्यासाठी केला जात होता. अशा परिस्थितीत गुरु गोविंद सिंह यांनी धर्माला सामाजिक न्यायाचे साधन बनवले. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे कर्मकांड नव्हे, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा आणि मानवतेच्या रक्षणासाठी केलेली कृती होती.

गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक कार्याचा केंद्रबिंदू म्हणजे खालसा पंथची स्थापना. ही घटना केवळ धार्मिक नव्हती, तर ती सामाजिक क्रांतीची सुरुवात होती. खालसा पंथाने जात, वर्ण, जन्माधारित श्रेष्ठत्व आणि सामाजिक भेदभाव यांना ठामपणे नाकारले. खालसा पंथात प्रवेश करताना सर्वांना समान ओळख देण्यात आली. सिंह आणि कौर ही नावे स्वीकारून स्त्री-पुरुषांना समान दर्जा देण्यात आला. या कृतीतून गुरु गोविंद सिंह यांनी स्पष्ट संदेश दिला की, मानवाची ओळख त्याच्या जन्मावर नाही, तर त्याच्या मूल्यांवर आणि कर्तृत्वावर आधारित असावी.

स्त्री-पुरुष समानतेचा विचार गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. त्या काळात स्त्रीला समाजात दुय्यम स्थान दिले जात होते. अनेक अमानवी प्रथा आणि रूढी स्त्रीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालत होत्या. गुरु गोविंद सिंह यांनी या अन्यायकारक व्यवस्थेला विरोध केला. खालसा पंथात स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच सन्मान, अधिकार आणि जबाबदाऱ्या दिल्या. स्त्री ही दुर्बल नसून समाजाच्या परिवर्तनाची शक्ती आहे, असा विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मांडला. त्यामुळेच शीख परंपरेत स्त्रीला आत्मसन्मानाचे स्थान मिळाले.

गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक विचारात आत्मसन्मान आणि स्वाभिमानाला अनन्यसाधारण महत्त्व होते. त्यांनी आपल्या अनुयायांना गुलामगिरीची मानसिकता झुगारून देण्याचा संदेश दिला. अन्याय सहन करणे हा धर्म नाही, तर अन्यायाला विरोध करणे हेच खरे धार्मिक कर्तव्य आहे, हा विचार त्यांनी समाजात रुजवला. याच विचारातून संत-सिपाही ही संकल्पना पुढे आली. मनाने संत असावे, परंतु अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आवश्यक ते धैर्य आणि शक्ती अंगी असावी, असा त्यांचा आग्रह होता. ही संकल्पना सामाजिक न्यायाच्या संघर्षाला नैतिक अधिष्ठान देणारी ठरली. धार्मिक सहिष्णुता आणि मानवता हा गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक कार्याचा आत्मा होता. त्यांनी कोणत्याही एका धर्माला श्रेष्ठ मानले नाही, तर सर्व धर्मांचा आदर करण्याचा संदेश दिला. त्यांच्या लिखाणातून आणि उपदेशातून मानवतेचे सर्वोच्च मूल्य सतत अधोरेखित होते. देवपूजेपेक्षा मानवसेवा श्रेष्ठ आहे, हा विचार त्यांनी समाजात दृढ केला. त्यामुळे शीख धर्म हा केवळ धार्मिक पंथ न राहता मानवी मूल्यांवर आधारित सामाजिक चळवळ बनला.


डॉ. राजेंद्र बगाटे
मो. क्र. ९९६०१०३५८२,
bagate.rajendra5gmail.com

गुरु गोविंद सिंह यांनी शिक्षण आणि विवेकशीलतेलाही सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन मानले. अंधश्रद्धा, रूढीवादी परंपरा आणि अज्ञान यांना त्यांनी समाजाच्या प्रगतीतील मोठे अडथळे मानले. त्यामुळे त्यांनी आपल्या अनुयायांना ज्ञानसंपन्न, विचारशील आणि प्रश्न विचारणारे बनवण्यावर भर दिला. शिक्षण हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नव्हे, तर समाजाच्या नैतिक उन्नतीसाठी आवश्यक आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या विचारांमुळे समाजात विवेकवादी दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली.

त्यांच्या सामाजिक कार्यात सेवा आणि त्यागाला अनन्यसाधारण स्थान होते. गुरु गोविंद सिंह यांचे संपूर्ण जीवनच त्यागाचे प्रतीक होते. त्यांनी आपल्या कुटुंबीयांचे, पुत्रांचे बलिदान दिले, तरीही अन्यायापुढे झुकण्यास नकार दिला. हे बलिदान केवळ धार्मिक नव्हते, तर ते मानवी स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आत्मसन्मानासाठी होते. त्यांच्या या त्यागातून समाजाला धैर्य, निष्ठा आणि मूल्यनिष्ठ जीवनाचा आदर्श मिळतो. आजही त्यांचे जीवन सांगते की, सत्य आणि न्यायासाठी दिलेले बलिदान कधीही व्यर्थ जात नाही.

गुरु गोविंद सिंह यांचे सामाजिक कार्य हे कालातीत आहे. आजच्या आधुनिक समाजातही जातीय भेदभाव, धार्मिक असहिष्णुता, स्त्री-पुरुष असमानता, सामाजिक अन्याय आणि शोषण विविध स्वरूपांत अस्तित्वात आहेत. अशा वेळी गुरु गोविंद सिंह यांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. समता, बंधुता, न्याय आणि मानवतेवर आधारित समाजनिर्मितीचा त्यांचा संदेश आजच्या पिढीसाठी दिशादर्शक ठरतो.

वर्तमानपत्रात त्यांच्या जयंतीनिमित्त प्रसिद्ध होणारा लेख हा केवळ इतिहासाची उजळणी नसून समाजाला आत्मपरीक्षण करण्याची संधी देणारा असतो. गुरु गोविंद सिंह यांनी दिलेला सामाजिक संदेश आपल्याला सांगतो की, धर्म हा माणसामाणसांमध्ये भिंती उभ्या करण्यासाठी नसून, त्या भिंती पाडण्यासाठी असावा. शक्ती ही दडपशाहीसाठी नव्हे, तर संरक्षणासाठी आणि न्यायासाठी वापरली जावी. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, प्रत्येक मानव हा सन्मानास पात्र आहे.

२२ डिसेंबर रोजी आपण गुरु गोविंद सिंह यांची जयंती साजरी करताना आपण केवळ धार्मिक विधी आणि समारंभांपुरते मर्यादित न राहता, त्यांच्या सामाजिक कार्याचा आशय आत्मसात करणे गरजेचे आहे. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांच्या बाजूने उभे राहणे, स्त्री-पुरुष समानतेचा आदर करणे, जात-धर्माच्या पलीकडे जाऊन मानवतेची कास धरणे, हाच त्यांच्या विचारांना खरे अभिवादन ठरेल. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन जर आपण न्याय, समता आणि बंधुतेसाठी सतत कार्यरत राहिलो, तरच गुरु गोविंद सिंह यांच्या विचारांचे खरे स्मरण आणि त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य साध्य होईल.

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# शाळा आता मनमानी पद्धतीने 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल' शब्द वापरू शकणार नाहीत; शिक्षण संचालनालयाने का दिली सक्तीची तंबी?

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील शाळांकडून आपल्या नावांमध्ये 'ग्लोबल', 'इंटरनॅशनल', 'सीबीएसई' अशा फॅन्सी शब्दांचा वापर करून पालक आणि विद्यार्थ्यांची दिशाभूल व फसवणूक केली जात असल्याचे उघड झाले आहे.

या गंभीर प्रकाराची दखल घेत शिक्षण संचालनालयाने आता कठोर पाऊल उचलले आहे. पालक-विद्यार्थ्यांची फसवणूक थांबवण्यासाठी अशा शब्दांचा वापर करणाऱ्या शाळांवर बंदी घालण्यात आली असून, त्यांना तात्काळ नावे बदलण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या अनेक शाळांनी आपल्या नावांमध्ये 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'सीबीएसई' किंवा 'इंग्लिश मीडियम' यांसारख्या शब्दांचा गैरवापर सुरू केला होता. या शब्दांमुळे संबंधित शाळा आंतरराष्ट्रीय किंवा केंद्रीय शिक्षण मंडळाशी संलग्न असल्याचा पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा गैरसमज होत होता, ज्यामुळे त्यांची दिशाभूल होत होती. अनेक शाळांकडे कोणतीही आंतरराष्ट्रीय संलग्नता नसतानाही ते असे शब्द वापरत असल्याचे शिक्षण संचालनालयाच्या तपासणीत आढळले.



**हा निर्णय कोणी घेतला आणि कशासाठी?**

हा निर्णय शिक्षण संचालनालयाने घेतला आहे.

उद्देश: पालक, विद्यार्थी आणि समाजाची दिशाभूल किंवा फसवणूक करणारे गैर-कायदेशीर शब्द शाळांच्या नावांमध्ये वापरले जाऊ नयेत, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

स्पष्टीकरण: 'सीबीएसई' हे केंद्र सरकारने स्थापन केलेल्या परीक्षा मंडळाचे नाव आहे. राज्य मंडळाच्या शाळांनी हे नाव वापरणे कायदेशीरदृष्ट्या अनुचित आहे. तसेच, 'इंटरनॅशनल' किंवा 'ग्लोबल' शब्द वापरण्यासाठी परदेशातील शाखा किंवा अधिकृत आंतरराष्ट्रीय संलग्नता असणे बंधनकारक आहे, जी या शाळांकडे नाही.

हा निर्णय अलीकडेच शिक्षण संचालनालयाने घेतला असून, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि शिक्षण निरीक्षक यांना याबाबत कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**कारवाई कशी होणार?**

तात्काळ नाव बदलण्याचे निर्देश: नावांमध्ये दिशाभूल करणारे शब्द आढळल्यास, संबंधित शाळा व्यवस्थापनांना तात्काळ नाव बदलण्यास सांगितले जाणार आहे.

नव्याने येणाऱ्या प्रस्तावांची तपासणी: नव्याने मान्यता मागणाऱ्या किंवा दर्जावाढीसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्या शाळांच्या नावांची काटेकोर तपासणी केली जाईल. पालकांवर प्रतिकूल परिणाम होईल अशी नावे आढळल्यास, ती बदलल्यानंतरच शिफारस केली जाईल.

## अकरा शाळांवर कारवाई

नावामध्ये दिशाभूल करणारे शब्द वापरणाऱ्या राज्यातील अकरा शाळांची यादी संचालनालयाने जाहीर केली आहे.

ब्राईट फ्युचर इंटरनॅशनल स्कूल, मिरज, जिल्हा सांगली

पोदार इंटरनॅशनल स्कूल, मिरज, जिल्हा सांगली

युरोप्रो इंटरनॅशनल स्कूल, कूर, तालुका भुदरगड, जिल्हा कोल्हापूर

गौतम सिंघानिया ग्लोबल स्कूल, मौजे उंबर्डे, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे

पोदार इंटरनॅशनल स्कूल, टिटवाळा, तालुका कल्याण डोंबिवली, जिल्हा ठाणे

स्नेहलता देव इंटरनॅशनल स्कूल, कौसा, जिल्हा ठाणे

एस. व्ही. एस. इंटरनॅशनल स्कूल, टेंभुर्णी, तालुका माढा, जिल्हा सोलापूर

भारत ग्लोबल स्कूल, वाघोली, तालुका हवेली, जिल्हा पुणे

सी. एम. इंटनॅशनल स्कूल, विद्यानगर टिंगरेनगर, धानोरी, तालुका हवेली, जिल्हा पुणे

सत्यस्पर्श इंटरनॅशनल स्कूल, उंबरे, तालुका राहुरी, जिल्हा अहिल्यानगर

सिध्दांत इंटरनॅशनल स्कूल, सदुंबरे, तालुका मावळ, जिल्हा पुणे

या शाळांवर कारवाई केली जाईल.

पान एक वरुन

## धनंजय मुंडेंनी परळीचा गड राखला

परळी नगरपरिषद निवडणुकीत महायुतीने प्रचंड बहुमताने विजय मिळवला आहे.

महायुतीने नगरसेवक पदाच्या दोन जागा मतदानापूर्वीच बिनविरोध जिंकत विजयाची सलामी दिली होती. उर्वरित ३३ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व शिवसेना (एकनाथ शिंदे) यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने एकसंघपणे लढत देत सत्ता मिळवली. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवार पद्मश्री धर्माधिकारी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) यांच्या उमेदवार संध्या दीपक देशमुख यांचा मोठ्या फरकाने पराभव केला. काँग्रेसच्या सय्यद मैमुना हनीफ या तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या.

**नगरसेवक पदावर महायुतीची मजबूत पकड**

नगरपरिषदेच्या नगरसेवक पदाच्या निवडणुकांमध्येही महायुतीने स्पष्ट वर्चस्व राखले आहे. एकूण ३५ जागांपैकी विविध पक्ष व गटांचे प्रतिनिधी निवडून आले असून, त्यामध्ये महायुतीतील उमेदवारांची संख्या लक्षणीय आहे.

## माजलगावात नगराध्यक्षपदी महरीन

विराजमान होऊ शकल्या. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे १० , राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे १० , काँग्रेस १ ,भाजप १, एम.आय.एम --१ व अपक्ष ३ नगरसेवक पदाचे उमेदवार निवडून आले.

**अनेकांना मतदारांनी नाकारले**

प्रभाग १० मध्ये मतदारांनी माजी आ. राधाकृष्ण होके पाटील यांचे पुतणे अभय होके पाटील , भाजपा सोशल मीडिया सेलचे दत्ता महाजन, भाजपाचे शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी , मुंबई बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांचे पुतणे अजिंक्य डक , माजी नगराध्यक्ष सुमनबाई मुंडे यांना मतदारांनी नाकारले तर माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांना केवळ १२७ मते मिळाल्याने त्यांना आपले डिपॉझिटही वाचवता आले नाही.

## आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने कमीच जाग

भूमिका मांडली.

आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने कमीच जागा लढवल्या होत्या. मला कमी वेळ मिळाला. तरीदेखील आम्ही जास्तीत जास्त प्रचाराला जाण्याचा प्रयत्न करत आहोत. मी एका दिवसाला सात-सात सभा घेत होतो. माझे सहकारीदेखील सभा घेत होते. आम्ही समाधानी आहोत. पण अजून आम्हाला काम करणं गरजेचं आहे, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली.

**पालकमंत्रीपदाचा तिढा कधी सुटेल?**

पालकमंत्रीपदाचा पूर्ण अधिकार राज्याचे प्रमुख असलेल्या मुख्यमंत्र्यांचा असतो. रायगड आणि नाशिकच्या जिल्ह्यांचे पालकमंत्रीपदाचा तिढा सोडवण्यासाठी मुख्यमंत्री सक्षम आहेत. एक वर्षे जरी झालेला असला तरी आम्ही तिथे कुठलंही विकासाचं काम थांबवू दिलेलं नाही. कुंभ मेळाव्याचं काम देखील तिथे जोरात आहे. रायगडमध्ये देखील निधीचं वाटप व्यवस्थित सुरु आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

**महापालिका निवडणुकीत शरद पवारांच्या पक्षासोबत युती करणार?**

यावेळी पत्रकारांनी अजित पवारांना एक महत्त्वाचा प्रश्न विचारला. महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत युती करणार का? असा प्रश्न अजित पवारांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी उत्तर देणं टाळलं आहे. आज रात्री विचार करुन सांगतो, असं मिश्किल उत्तर त्यांनी दिलं. तसेच शरद पवारांच्या पक्षाचे पुणे शहराध्यक्ष राष्ट्रवादीसोबत युती करण्यास विरोध करत आहेत. त्याबाबतही त्यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी ठिक आहे. प्रत्येकाला स्वत:चं मत मांडण्याचा अधिकार असतो. तसं ते मांडत आहेत, असं उत्तर अजित पवारांनी दिलं.

महायुतीत सत्तेत असताना आम्हाला अनेक ठिकाणी एकमेकांच्या विरोधात उभं राहावं लागलं ही वस्तुस्थिती आहे. पण आम्ही तारतम्य ठेवून प्रचार करत होतो. जनतेने आम्हाला चांगला कौल दिला आहे. त्यामुळे मी महाराष्ट्रातील मतदारांचे मनापासून आभार मानतो. पुणे जिल्ह्यातही चांगला निकाल लागला आहे. मी मतदारांचे आभार मानतो. मी सर्व निवडून आलेल्या २८८ नगराध्यक्षांचे अभिनंदन करतो, अशा शुभेच्छा अजित पवारांनी दिल्या.

महापालिकांबाबत मुख्यमंत्र्यांनी सुतोवाच केलेलं आहे. मी पुणे जिल्ह्यात गेल्या ३५ वर्षांपासून काम करतो आहे. मला या जिल्ह्याने नेहमी साथ दिलेली आहे. नगर परिषद निवडणुकीतही चांगली साथ दिली आहे. अनेक ठिकाणी चुरशीची लढत होती. पण तिथेही साथ दिली. मधल्या काळात आमचं ठरलं होतं की, आम्ही मित्रपक्षांनी एकमेकांचे पदाधिकारी घ्यायचे नाहीत. पण ते घेतले गेले. त्याबद्दल मुंबईत गेल्यावर आम्ही चर्चा करु. ९ वर्षांनी निवडणूक होत आहेत. त्यामुळे दुसऱ्या पक्षातील माणसं घेतली तर त्या पक्षाचे इच्छुक उमेदवार नाराज होतील, असं रोखठोक मत त्यांनी व्यक्त केलं.

एकनाथ शिंदेंना शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना संधी द्यायची आहे, मला माझ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना संधी दिली आहे. शेवटी आम्ही सगळे जण या सगळ्यांच्या मदतीने २८८ मतदारसंघात लढलो. त्यापैकी २३८ मतदारसंघांमध्ये आमच्या जिवाभावाची कार्यकर्त्यांनी आम्हाला निवडून आणण्याचं काम केलं. पण कार्यकर्त्याला संधी मिळायला पाहिजे. त्यामुळे आम्ही काही ठिकाणी एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढलो. आतादेखील महापालिका निवडणूक आहेत. प्रत्येकाला वाटतं की, आपला महापौर व्हावा. तसे प्रयत्न सगळ्यांचे सुरु आहेत. तिथल्या परिस्थितीनुसार तिथले जिल्हाध्यक्ष निर्णय घेतील, अशी भूमिका अजित पवारांनी मांडली.

## ७५ टक्के नगराध्यक्ष महायुतीचे,

इतिहासातील पहिली निवडणूक असेल, ज्यात एखाद्या पक्षाचा मुख्यमंत्री कुणावरही एक सूतभरही टीका न करता, त्यांचा पक्ष विजयी होतो. एक प्रकारे लोकांनी आमच्या विकास कामांना दिलेली ही तर पावती आहे.

दरम्यान, महाराष्ट्राच्या जनतेने भारतीय जनता पक्षाला आणि आमच्या महायुतीला प्रचंड मोठे समर्थन दिले आहे, असे म्हणत, मी महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानले, असेही फडणवीस म्हणाले.

# फलटण महिला वैद्यकीय अधिकारी मृत्यू प्रकरणी फौजदारी याचिका उच्च न्यायालयात दाखल

## त्रयस्थ आणि स्वतंत्र अधिकाऱ्याची समिती गठीत करून चौकशी करण्यात यावी– अ‍ॅड. वर्षा देशपांडे

सातारा । प्रतिनिधी

फलटणच्या महिला वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मृत्यू प्रकरणात आरोपी पोलीस अधिकारी असल्याने तपास योग्य पद्धतीने व्हावा म्हणून त्रयस्थ आणि स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करावी. पोलीस यंत्रणे शिवाय स्वतंत्र यंत्रणेकडे या गुन्ह्याचा तपास व्हावा, अशी मागणी आपण उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाकडे फौजदारी याचिकेद्वारे केली असल्याची माहिती लेक लाडकी अभियानाच्या प्रवर्तक ड. वर्षा देशपांडे यांनी दिली.

त्यांनी सांगितले की, या गुन्ह्यात आरोपी पोलीस अधिकारीअसल्याने पोलीस वगळता स्वतंत्र आणि त्रयस्थ अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली चौकशी समितीने या गुन्ह्याचा तपास करावा.. मृत व्यक्ती अथवा त्याच्या कुटुंबियांच्या सन्मानाला बाधा येईल अशा पद्धतीने मृत व्यक्ती अथवा कुटुंबीयांची ओळख उघड होऊ नये याची काळजी घेतली जावी. काही वृत्तपत्रे, समाज माध्यमे अथवा पोलिसांकडून अशा पद्धतीचे वर्तन यापूर्वी झाले असल्यास संबंधितांवर कारवाई करावी, या तीन मागण्या आम्हीं कोल्हापूर खंडपीठाकडे केल्या आहेत.




फलटणच्या डॉक्टर युवतीने आत्महत्या केली. ही आत्महत्या कथित आहे. या संदर्भात डॉक्टर युवतीचे बंधू तसेच बीड जिल्ह्यात ऊसतोड कामगारांसाठी काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या सिंधू वरकटे ठोंबरे व मी आम्हीं तिघांनी मिळून फौजदारी स्वरूपाची याचिका

उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठांसमोर दाखल केली आहे. नुकतीच त्याची सुनावणी झाली. त्यात सरकारी वकीलांना कोर्टाने कडक शब्दात सुनावले आणि आदेशित केले की संबंधित तरुणीचा फोटो डोळ्यावर पट्टी बांधून सुद्धा, त्या कुटुंबाचे नाव किंवा तिच्या नातेवाईकांचे फोटो कोणत्याही प्रसार माध्यमांमध्ये आले असतील तर संबंधितांना तातडीने नोटीस देऊन ते काढून टाकण्यात यावेत.

याचिकाकर्त्यांच्या म्हणजे आमच्या वतीने ड गार्गी वारूंजीकर आणि ड सोनाली चव्हाण या महिला वकील म्हणून हजर झाल्या आहेत. ड नेहा देशपांडे या कोल्हापुर येथे या केसचे कामकाज पाहतात. याप्रकरणी आमच्या वतीने न्यायालयासमोर ड उदय आशा प्रकाश वारुंजीकर यांनी युक्तिवाद केला. याबाबत न्यायालयाकडून पुढील सुनावणी दरम्यान निर्णय अपेक्षित आहे.

# काँग्रेस भाजपची बी-टीम आमदार रोहित पवारांची टिका

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी काँग्रेसच्या विजयावर जोरदार निशाणा साधत, काँग्रेस भाजपची बी-टीम असल्याची टीका केली आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे चित्र स्पष्ट होताच, महाविकास आघाडीमध्ये अंतर्गत कलह निर्माण झाला आहे. काँग्रेसने आघाडीत सर्वाधिक ३२ जागा जिंकल्या असल्या तरी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी या यशावर आनंद व्यक्त करण्याऐवजी काँग्रेसच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. रोहित पवार यांनी ट्विटरवर पोस्टच्या माध्यमातून तीव्र नाराजी व्यक्त करत काँग्रेसच्या रणनीतीवर टीका केली.

**काँग्रेस भाजपची बी-टीम-रोहित पवारांची टिका**

आमदार रोहित पवार यांनी काँग्रेसवर गंभीर आरोप करत म्हटले आहे की, धर्मनिरपेक्षता आणि समानतेचा पुरस्कार करणारा पक्ष भाजपच्या तिकिटावर उमेदवार उभे करत होता. काँग्रेसने भाजपची बी-टीम म्हणून काम केले आणि एका जातीयवादी पक्षाच्या विजयात हातभार लावला. सामान्य लोक काँग्रेसच्या या कुटिल डावपेचांना बळी पडले आहेत आणि आता जिल्ह्यातील काँग्रेस नेत्यांवर विश्वास ठेवणे कठीण झाले आहे.

**पैशाच्या राजकारणावर निशाणा**

रोहित पवार यांनी निवडणूक प्रक्रियेत पैशाच्या शक्तीच्या वाढत्या प्रभावाबद्दल चिंता व्यक्त केली. आज तत्वे आणि विकासावर आधारित राजकारण नाहीसे होत आहे आणि त्याची जागा पैशाने दूषित राजकारणाने घेतली आहे. विरोधी पक्षात निवडून आलेल्या काही लोकांच्या चुका आणि व्यवसाय पाहून त्यांना त्यांची जाहीरपणे नावे घेण्यासही लाज वाटते. ही परिस्थिती राजकारणाच्या घसरत्या दर्जाकडे निर्देश करते. असेही रोहित पवार यांनी म्हटले आहे.

निवडणूक निकालांवर प्रतिक्रिया देताना रोहित पवार यांनी सांगितले की, मनापासून मतदान केल्याबद्दल ते जनतेचे आभार मानतात; मात्र समर्पित कार्यकर्त्यांसाठी हे निकाल निराशाजनक ठरले आहेत. राजकारणात जर पैसा हेच सर्वस्व ठरत असेल, तर बचत गट, शेतकरी आणि लहान दुकानदारांसारख्या सामान्य कुटुंबातील उमेदवारांना न्याय कधी मिळणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सामान्य व दुर्लक्षित घटकांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना सध्याच्या निवडणूक ट्रेंडमुळे अडथळा निर्माण होत असल्याची चिंता रोहित पवार यांनी व्यक्त केली.

## निवडक वृत्त

### विदर्भात नेत्यांची ताकद जाणीवपूर्वक कमी केल्याचा सुधीर मुनगंटीवार यांचा आरोप



चंद्रपूर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकांचे निकाल हे केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकाल न राहता, भाजपसाठी गंभीर राजकीय इशारा ठरले आहेत. सलग काही निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्ष म्हणून भाजपला मिळणारा जनाधार या निकालांमधून कमकुवत होत असल्याचे स्पष्ट संकेत मिळतात.

विशेष म्हणजे, पराभवामागे विरोधकांपेक्षा पक्षातील अंतर्गत कारणे अधिक जबाबदार असल्याचे भाजपचेच ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी उघडपणे मान्य केल्याने या निकालांचे राजकीय महत्त्व अधिक वाढले आहे.

मुनगंटीवारांच्या वक्तव्यातून भाजपमधील अंतर्गत गटबाजी, नेतृत्वाचा अभाव आणि संघटनात्मक विस्कळीतपणा समोर येतो. विदर्भात काही नेत्यांची ताकद जाणीवपूर्वक कमी केल्याचा आरोप म्हणजे थेट नेतृत्वाच्या निर्णयप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह आहे. मजबूत स्थानिक नेतृत्वाला डावलून 'इनकमिंग' नेत्यांना पुढे केल्यामुळे जुने कार्यकर्ते नाराज झाले, याचा फटका मतदानाच्या दिवशी दिसून आला.

### खंडोबाच्या पायरीवर भंडाऱ्याचा भडका, नव्या नगरसेविकांसह १६ जण गंभीर

पुणे । प्रतिनिधी

जेजुरीत मतमोजणी संपल्यानंतर विजयी जल्लोषाला शोकाची छाया पडेल, अशी धक्कादायक घटना जेजुरीत घडली. खंडोबा गडाच्या पहिल्या पायरीवर भाविक व कार्यकर्त्यांनी भंडारा अर्पण करताना अचानक भीषण भडका उडून किमान १६ जण गंभीर भाजल्याची घटना दुपारी सुमारे ३ वाजता घडली.

जखमींमध्ये दोन नव्याने निवडून आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविकांसह अनेक महिला, तरुणांचा समावेश आहे.

घटनेनंतर परिसरात मोठी दहशत निर्माण झाली. क्षणभरात भंडाऱ्याने पेट घेतला आणि जोरदार आवाजासह स्फोट होऊन आजूबाजूचे लोक होरपळले. भाजलेल्या जखमींना तातडीने जेजुरीतील खाजगी तसेच शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काहींना पुढील उपचारासाठी पुण्यात हलविण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.

मल्हार नाट्यगृहात मतमोजणी पूर्ण होऊन निकाल जाहीर होताच राष्ट्रवादी काँग्रेसचे विजयी उमेदवार, समर्थक व कार्यकर्ते खंडोबाच्या दर्शनासाठी गडाच्या पहिल्या पायरीवर गेले होते. येथे भाविकांनी मोठ्या प्रमाणावर भंडारा उधळताना वापरलेल्या भंडाऱ्याने अचानक पेट घेतला. अत्यंत ज्वालाग्राही घटक मिश्रित असल्यामुळे भडका एकदम मोठा झाला आणि अनेक जण त्यात सापडले. स्फोटासारखा आवाज झाल्यानंतर क्षणात परिसर धुराने व्यापला. काही काळासाठी तिथे प्रचंड घबराट पसरली होती.

# लातूर ते मुंबई प्रवास फक्त ५.५ तासांत होणार!

## कोकण-मराठवाड्याला थेट जोडणारा हाय-स्पीड हायवे मंजूर

मुंबई । प्रतिनिधी

कोकणला मराठवाड्याशी जोडणाऱ्या ४४२ किमी लांबीच्या लातूर-बदलापूर समर्पित हाय-स्पीड हायवेला राज्य सरकारने अलिकडेच मंजुरी दिल्याने मराठवाडा प्रदेशाला मोठा फायदा होईल. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची किंमत अंदाजे ३५,००० कोटी रुपये आहे. पूर्ण झाल्यावर मराठवाड्याची शैक्षणिक राजधानी असलेल्या लातूर ते मुंबई हे अंतर ८ ते ९ तासांवरून फक्त साडेपाच तासांपर्यंत कमी होईल.

या महामार्गाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रसिद्ध माळशेज घाट परिसरातील प्रस्तावित ८ किमी लांबीचा बोगदा, जो विशेषतः पावसाळ्यात वाहतूक कोंडी आणि वेळखाऊ प्रवासापासून मुक्तता मिळविण्यात प्रभावी ठरेल. कोकणातील, विशेषतः



लातूरमधील लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्यासमोर यासाठी सातत्याने आग्रह धरला होता.

माजी लोकसभा अध्यक्ष दिवंगत शिवराज पाटील चाकूरकर यांनीही शेवटपर्यंत या महामार्गासाठी वकिली केली. विकास आणि आधुनिक सुविधांचे जाळे म्हणून, हा प्रकल्प नवीन उद्योगांना प्रोत्साहन देईल. मालवाहतूक आणि व्यापाराला चालना देण्यासाठी लॉजिस्टिक्स पार्क देखील प्रस्तावित आहे. यामुळे पर्यटनाला चालना मिळेल. रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील.

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर आणि मुंबई ते मराठवाडा जोडणारा हा महामार्ग शेतकरी, व्यापारी आणि उद्योजकांसाठी अत्यंत फायदेशीर ठरेल. लातूर-माळशेज-म्हशा-बोराडपाडा मार्गावरून जाणारा हा ४४२ किमी लांबीचा महामार्ग प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी करेल. हा महामार्ग अहिल्या नगर, बीड, मांजरसुवा आणि अंबाजोगाई मार्गे थेट लातूरला पोहोचेल आणि कर्नाटकला प्रवास देखील सुलभ करेल. विरार आणि अलिबाग सारख्या बहुउद्देशीय महामार्गांशी जोडल्याने प्रादेशिक संपर्क अधिक मजबूत होईल.

# पंतप्रधान मोदींच्या योजनांवरचा आशीर्वाद; अमित शाहंकडून कौतुकाची थाप

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील २८८ नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत महायुतीने विरोधकांचा धुव्वा उडवत दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयानंतर देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी ट्वीट करत महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानले आहेत.



भाजप या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने ग्रामीण आणि निमशहरी भागात आपली पकड पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

**मोदीजींच्या व्हिजनवर जनतेचा विश्वास**

महाराष्ट्र नगर पंचायत आणि नगर परिषद निवडणुकीत महायुतीला प्रचंड समर्थन दिल्याबद्दल राज्यातील जनतेचे आभार. हा विजय पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारांच्या जनकल्याणकारी योजनांवर जनतेने दिलेला आशीर्वाद आहे, असं अमित शाह यांनी म्हटलं. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

**भाजपची विक्रमी कामगिरी**

या निवडणुकीत भाजपने केवळ सर्वाधिक जागाच जिंकल्या नाहीत, तर बहुतांश नगराध्यक्षपदांवरही आपला ताबा मिळवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यात भाजपचे ३,३०० पेक्षा जास्त नगरसेवक निवडून आले आहेत. तर भाजपचे १२२ ते १३४ नगराध्यक्ष थेट निवडून येण्याचा अंदाज आहे. एकूण निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी तब्बल ४८ टक्के नगरसेवक एकट्या भाजपचे आहेत.

# नाद करायचा नाय, मतदार जागा हाय! आमदाराच्या अख्खा कुटुंबाला घरी पाठवलं, घराणेशाहीला साफ नाकारलं



कोल्हापूर । प्रतिनिधी

राज्यातील नगर परिषद आणि नगर पंचायतींचे निकाल आज जाहीर झाले. या निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला. भाजपनं जोरदार मुसंडी मारत आपलं वर्चस्व कायम राखलं. नांदेडमध्ये एकाच कुटुंबातील सहा जणांचा मतदारांनी पराभव केला.

भाजपनं एकाच परिवारातील सहा जणांना तिकिटं दिलं होतं. पण जनतेनं घराणेशाही नाकारली. सर्वच्या सर्व सहा उमेदवारांचा पराभव झाला. असाच काहीसा निकाल कोल्हापूरच्या हातकणंगलेमध्येही लागला.

कोल्हापूरच्या शिरोळ तालुक्यातील आमदार अशोक माने यांना मतदारांना मोठा झटका दिला. शिरोळ नगर पंचायतीच्या निवडणुकीत अशोक माने यांची घराणेशाही मतदारांनी घरी बसवली. त्यांच्या कुटुंबातील तीन सदस्यांचा दारुण पराभव झाला. यामध्ये त्यांचा मुलगा, सून आणि पुतण्या यांचा समावेश आहे. अशोक माने यांना मतदारांनी त्यांच्याच होमपीचवर जोरदार झटका दिला. अशोकराव माने यांची सून सारिका अरविंद माने यांचा नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत मोठ्या फरकानं पराभव झाला.

अशोक माने यांचे पुत्र अरविंद माने नगरसेवक पदासाठी निवडणूक लढत होते. त्यांचाही पराभव झाला. अशोक माने यांच्या पुतण्यालादेखील मतदारांनी नाकारलं. हातकणंगले मतदारसंघाचे आमदार असलेल्या अशोक माने यांच्याकडून घराणेशाही लादण्याचा प्रयत्न झाला. पण शिरोळच्या मतदारांनी त्यांची प्रयत्न हाणून पाडले. या निकालाची चर्चा अख्ख्या कोल्हापुरात आहे. शिरोळ नगर पालिकेत आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर यांची सत्ता संपुष्टात आली आहे. यड्रावकर यांनी माजी खासदार राजू शेट्टी आणि गणपतराव पाटील यांनी आव्हान दिलं होतं. शिरोळ नगर पालिकेत महायुती आणि ताराराणी आघाडी यांची युती होती.

**अशोकराव माने नेमके कोण?**

असोकराव माने कोल्हापूरच्या हातकणंगले विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. गेल्या वर्षी झालेल्या निवडणुकीत त्यांनी जनसुराज्य शक्ती पक्षाकडून निवडणूक लढवली. त्यांनी काँग्रेसच्या राजू आवळे यांचा ४६ हजार २४९ मतांनी पराभव केला. राजू आवळे २०१९ ते २०२४ या कालावधीत हातकणंगलेचे आमदार होते. २०१९ मध्ये अशोकराव माने जनसुराज्य शक्तीकडून विधानसभा लढले. त्यावेळी ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

# नगरपालिका निवडणुकीतील सत्ताधारी पक्षांचा विजय निवडणूक आयोगाच्या आशिर्वादाने–हर्षवर्धन सपकाळ

मुंबई । प्रतिनिधी

नगरपालिका, नगरपरिषद निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाचा गलथान कारभार अधिरेखीत झाला आहे. मतदान प्रक्रियेचा पुरता गोंधळ घातला गेला, तारिख पे तारिख चा खेळ केला. ही निवडणूक फ्रि अँड फेअर अशी झाली नाही. सत्ताधारी पक्षाकडून साम, दाम, दंड, भेद या नितीचा मुक्तपणे वापर करण्यात आला. निवडणुकीत बोगस मतदार, दडपशाही, सत्तेचा गैरवापर आणि पैशाचा प्रचंड वापर पहायला मिळाला. सत्ताधारी पक्षांच्या विजयात निवडणूक आयोगाची मदत सर्वात महत्वाची ठरली आहे, अशी प्रतिक्रीया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.



निवडणूक निकालावर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भाजपा महायुती सरकारच्या कामावर जनता प्रचंड नाराज आहे. भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात बोकाळला आहे, जनतेची कामं होत नाहीत, अशा परिस्थितीत आज आलेले निकाल जनतेचा कौल वाटत नाही. लोकशाही व संविधानाची पायमल्ली करत खुलेआमपणे दडपशाही करण्यात आली. निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुले बनले आहे. निवडणूक आयोगाचा गोंधळी कारभार व सत्ताधारी पक्षांचा पैसा फेक तमाशा देख, हा खेळ या निवडणुकीत पहायला मिळाला. या सर्व पार्श्वभूमीमुळे काँग्रेस पक्षाला अपेक्षित यश मिळालेले नाही. काँग्रेसला अपेक्षित यश मिळाले नसले तरी काँग्रेस पक्ष लोकशाही व संविधान रक्षणासाठी संघर्ष करत राहिल, आमची ही वैचारिक लढाई आहे असे सपकाळ म्हणाले.

नगरपालिका निवडणुकीत भाजपाला मिळालेले यश हे एकनाथ शिंदेंची शिवसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी धोक्याची घंटा आहे. शत प्रतिशत भाजपासाठी या दोन मित्रपक्षांना भाजपा बाहेरचा रस्ता दाखवेल, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# जामखेड नगरपरिषदेत भाजपाचं दणदणीत यश; प्रांजल चिंतामणी प्रचंड मतांनी नगराध्यक्ष पदी विजयी

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड नगरपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला दणदणीत यश मिळालं आहे. भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रांजल चिंतामणी या प्रचंड मतांनी विजयी झाल्या आहेत. या निवडणुकीत भाजपानं १५ जागांवर विजय मिळवत स्पष्ट वर्चस्व सिद्ध केलं आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसला ९ जागा आणि बहुजन वंचित आघाडीला २ जागांवर समाधान मानावं लागलं आहे. या विजयामागे भाजपाचे सभापती राम शिंदे यांचा मोठा वाटा असल्याचं बोललं जात आहे. जनतेनं दाखवलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रांजल चिंतामणी यांनी दिली आहे. जनतेनं आमच्यावर विश्वास टाकला आहे. त्या विश्वासाला आम्ही कधीही तडा जाऊ देणार नाही. जामखेडच्या विकासासाठी कटिबद्ध राहू, असं त्यांनी म्हटलं आहे.

निकालावर प्रतिक्रिया देताना सभापती राम शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे. विरोधकांनी विशेषतः आमदार रोहित पवार यांनी केलेल्या टीकेला जनतेनंच उत्तर दिलं असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. त्यांनी म्हटलं, शेवटी जनतेचं प्रश्न सोडवणं महत्त्वाचं असतं. भूमिपुत्र म्हणून जनतेनं मला कौल दिला. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर जनतेनं विश्वास व्यक्त केला. त्याचाही फायदा जामखेड नगरपरिषद निवडणुकीत भाजपाला झाला आहे. ज्या दिवशी विरोधकांनी मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला, त्या दिवशीच खऱ्या अर्थानं आम्ही विजयी झालो होतो. एकूणच जामखेड नगरपरिषद निवडणुकीत भाजपानं सत्ता कायम ठेवत राजकीय ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

# ४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवी फ. म. शहाजिंदे

## बीड जिल्ह्यात होणार संमेलन!

छत्रपती संभाजी नगर । प्रतिनिधी

४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवी फ. म. शहाजिंदे यांची एकमताने निवड झाली आहे. या साहित्य संमेलनासाठी शांतीवनचे संस्थापक दीपक नागरगोजे यांचे निमंत्रण होते. त्यांच्या शांतीवन प्रकल्प आर्वी, ता. शिरूर कासार या सेवाभावी संस्थेत एप्रिल महिन्यात संमेलन होईल.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीची बैठक रविवारी झाली. या बैठकीत फ. म. शहाजिंदे यांची निवड झाली. फ. म. शहाजिंदे यांची 'निधर्मी', 'आदम', 'ग्वाही', 'झोंबणी', 'शेतकरी' इत्यादी कवितासंग्रह; 'मी तू' ही कादंबरी तर 'सारांश', 'इत्यर्थ', 'शब्दबिंब' इत्यादी समीक्षाग्रंथ; 'वाकळ', 'प्रत्यय', 'अनुभव' हे लेखसंग्रह; 'मराठवाड्यातील कविता', 'पुरचुंडी', 'मूठभर माती : आशय व अन्वयार्थ', 'मुस्लिम मराठी साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप' ही संपादने प्रसिद्ध आहेत.

यापूर्वी त्यांनी पाचवे मराठवाडा युवक साहित्य संमेलन, पहिले मुस्लिम मराठी साहित्य संमेलन, अकरावे अंकुर साहित्य संमेलन, पहिले लातूर जिल्हा मराठी साहित्य संमेलन, पाचवे पुरोगामी मराठी साहित्य संमेलन, तिसरे शेकोटी साहित्य संमेलन, धारगळ, गोवा इत्यादी साहित्य संमेलनांची अध्यक्षपदे भूषविलेली आहेत.

आपल्या लेखनासाठी त्यांना विविध साहित्य संस्थांचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांच्या दीर्घ वाङ्मयीन लेखनाचा विचार करून परिषदेने या ४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची एकमताने निवड केली आहे. या बैठकीस अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले-पाटील, उपाध्यक्ष डॉ. आसाराम लोमटे, कार्यवाह डॉ. दादा गोरे, कोषाध्यक्ष डॉ. रामचंद्र काळुंखे, सहकार्यवाह डॉ. गणेश मोहिते, डॉ. दीपा क्षीरसागर व कार्यकारिणी सदस्य कुंडलिक अतकरे, प्रा. किरण सगर, दगडू लोमटे, देविदास फुलारी, डॉ. हेमलता पाटील, डॉ. ऋषीकेश कांबळे, डॉ. संजीवनी तडेगावकर, सरोज देशपांडे, संजीव कुलकर्णी, सुभाष कोळकर, विलास सिंदगीकर, डॉ. समिता जाधव, श्रीधर नांदेडकर, डॉ. हंसराज जाधव, डॉ. दिलीप बिरुटे, प्रभाकर साळेगावकर, मोहिब कादरी उपस्थित होते.

# ई-पीक पाहणी नोंद न झालेल्या शेतकऱ्यांसाठी ऑफलाइन पाहणीचा निर्णय; तहसीलदारांची माहिती

आष्टी । प्रतिनिधी

राज्यातील खरीप हंगाम २०२५ मध्ये विहित मुदतीत ई-पीक पाहणीची नोंद न झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची ऑफलाइन पाहणी करण्याबाबत महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.या शासन निर्णयानुसार खरीप हंगाम २०२५ मध्ये ज्या शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी विहित कालावधीत नोंद झाली नाही, अशा शेतकऱ्यांच्या पिकांची ऑफलाइन पद्धतीने पाहणी करण्यात येणार असल्याची माहिती तहसिलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात पुढे म्हणले आहेत की,त्यासाठी संबंधित मंडळ अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम महसूल अधिकारी, ग्राम विकास अधिकारी व सहायक कृषी अधिकारी यांची ग्रामस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.ज्ञ्ज्या शेतकऱ्यांना काही कारणास्तव खरीप हंगाम २०२५ मध्ये पिकांची ऑनलाईन नोंद करता आली नाही, अशा शेतकऱ्यांनी आपल्या गावच्या ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे दिनांक १७ डिसेंबर २०२५ ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत पिकांची नोंद करण्यासाठी अर्ज सादर करावेत. अर्ज सादर केल्यानंतर त्याची पोहोच (पावती) घेणे आवश्यक असल्याचेही कळविण्यात आले आहे.



प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने ग्रामस्तरीय समिती संयुक्तपणे संबंधित शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी करणार असून ही पाहणी २५ डिसेंबर २०२५ ते ०७ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे.स्थळ पाहणीपूर्वी समितीमार्फत पाहणीची दिनांक व वेळ निश्चित करून त्याची लेखी पूर्वसूचना संबंधित शेतकरी व शेजारील किमान ४ ते ५ शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.प्रत्यक्ष स्थळ पाहणीच्या दिवशी खरीप हंगाम २०२५ मध्ये शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष कोणती पिके घेतली होती, याबाबत स्थानिक चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक पंचनामा करण्यात येणार आहे. तसेच शेताच्या बांधाला लागून असलेल्या इतर शेतकऱ्यांचे जबाब नोंदविण्यात येतील. ज्या शेतकऱ्यांची पीक नोंदणी यापूर्वी गाव नमुना क्रमांक १२ वर प्रतिबिंबित झालेली नाही, त्यांच्यासाठी ही प्रक्रिया लागू राहणार आहे.

याबाबत तहसीलदार आष्टी वैशाली पाटील यांनी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना आवाहन केले असून, ज्या शेतकऱ्यांनी काही कारणास्तव खरीप हंगाम २०२५ मध्ये पिकांची ऑनलाईन नोंद केली नाही, त्यांनी दिलेल्या कालावधीत ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करून या संधीचा लाभ घ्यावा, असे त्यांनी म्हटले आहे.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा रूग्णालय यांचे संयुक्त विदयमाने जिव्हाळा बेघर निवारा केंदातील व्यक्तींची मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

बीड । प्रतिनिधी

दि.२० डिसेंबर २०२५ रोजी बीड येथील भाजी मंडई येथे असलेल्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे राहत असलेल्या व्यक्तींकरिता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, जिल्हा रूग्णालय बीड यांचे संयुक्त विदयमाने मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर आरोग्य तपासणी शिबीराचे उदघाटन अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद एल.यावलकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री.वहाब ए.सयद, लोकअभिरक्षक कार्यालयाचे मुख्य विधी सहाय संरक्षक ॲड.पी.व्ही.दगडखैर,



ॲड.व्ही.एस.जाधव, पीएलव्ही तत्वशिल कांबळे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक एस.टी.शिंदे, जिल्हा रूग्णालयातील डॉ.नितीन राठोड, डॉ.आशिष कोठारे, डॉ.अशोक मते, डॉ.गोस्वामी मॅडम, डॉ.वर्षाराणी जाधव, श्रीमती मनिषा आंधळे, श्रीमती प्रियंका भोंडवे, श्री.अंबादास जाधव, पी.एस.आय. राजाभाउ गुळभिले, अभिजीत वैदय, रेणूका माउली सेवाभावी संस्था बीड तथा संचालक जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्र, राजू वंजारे व्यवस्थापक, यश वंजारे काळजीवाहक इत्यादी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिव्हाळा बेघर केंद्राचे संचालक श्री.अभिजीत वैदय यांनी केले. या शिबीराच्या उदघाटन प्रसंगी बोलताना मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड यांनी आपल्या भाषणात सांगितले की, समाजामध्ये अनेकजण वृध्द लोकांचा सांभाळ करत नसल्यामुळे जिव्हाळा बेघर सारख्या निवारा केंद्र अशा लोकांचा सांभाळ करत आहेत हे एक खूप मोठे आणि जिकीरीचे काम जिव्हाळा केंद्र या ठिकाणी करत आहे.. वयस्कर नागरिक तसेच पालक यांचे पालनपोषण आणि कल्याण या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वृध्द नागरिकांच्या समस्यांचे समाधान घडवून आणण्यासाठी तत्पर आहे. प्रत्येक वृध्द यांचे घरी विधी अधिकार मित्र यांना पाठवून त्यांच्या समस्या काय आहेत हे जाणून घेण्याचे त्यांनी यावेळी आश्वासन दिले.

तसेच या वृध्द लोकांच्या कायदेविषयक अडचणी व समस्या निराकरण करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधण्याचे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

## सिंदफणा साहित्य संमेलनात कथाकथनाने भरली रंगत

पिंपळवंडी । प्रतिनिधी

शिरूर कासार येथे सातवे सिंदफणा मराठी साहित्य संमेलन ज्येष्ठ पत्रकार,साहित्यिक अमर हबीब यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.यामध्ये दि.१६ डिसेंबर २०२५ मंगळवार रोजी दुसऱ्या सत्रात झालेल्या कथाकथनामुळे ग्रामीण भाषेला उजाळा मिळाला.

दुपारच्या सत्रात प्रकाश भुते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कथाकथनात आराध्या गिते,अशोक नजान यांनी हळवा दिप्या या कथेतून पर्यावरणीय संदेश दिला.लक्ष्मण दिवटे यांनी उसवण,गोरख शेंद्रे यांनी संप्या, डॉ.भास्कर बडे यांनी देवाची वाटणी ही कथा सादर केली व अध्यक्षीय समारोपात प्रकाश भुते यांनी जुन्या काळातील लगीन ही कथा सादर केली.यावेळी संमेलनाध्यक्ष अमर हबीब,सुशिला ताई मोराळे,डॉ.विठ्ठल जाधव सह रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

# 'जामखेड गोळीबारातील तीन आरोपी जेरबंद' ; गावठी पिस्तूल व काडतुसे हस्तगत

जामखेड । प्रतिनिधी

जामखेड शहरातील कान्होपात्रानगर येथे हॉटेलचालकावर गावठी पिस्तुलातून गोळीबार करत जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुसक्या आवळल्या आहेत. तीन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गावठी पिस्तूल व जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत.

उल्हास ऊर्फ वस्ताद विलास माने (वय ४९, रा. तपनेश्वर गल्ली, जामखेड), शुभम शहाराम लोखंडे (वय २६, रा. आष्टी, कमान वेशीसमोर, आष्टी) व बालाजी शिवाजी साप्ते (वय २७, रा. तेली गल्ली, पांढरे मेडिकलच्या पाठीमागे, आष्टी) अशी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे आहेत. फिर्यादी रोहित अनिल पवार (रा. कान्होपात्रानगर, जामखेड) हे त्यांच्या जामखेड - बीड रोडवरील हॉटेल न्यू कावेरी या ठिकाणी असताना आरोपींनी त्यांच्यावर गावठी पिस्तुलातून गोळीबार केला.

जिवे मारण्याच्या उद्देशाने हा गोळीबार करण्यात आला होता. या घटनेबाबत जामखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेत पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना तपासाचे आदेश दिले. त्यानुसार कबाडी यांच्या पथकातील उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलिस अंमलदार अतुल लोटके, श्यामसुंदर जाधव, बाळासाहेब गुंजाळ, मनोज साखरे, सागर ससाणे, योगेश कर्डिले, प्रशांत राठोड, महादेव भांड, चंद्रकांत कुसळकर यांनी आरोपींचा शोध घेतला.

आरोपी उल्हास माने जामखेड रोडवरील आष्टी परिसरामध्ये असल्याची माहिती मिळाली. पथकाने हॉटेल साईराजसमोर सापळा लावून मानेला ताब्यात घेतले. इतर साथीदारांसोबत हा गुन्हा केल्याची कबुली त्याने दिली. त्यानंतर उर्वरित आरोपींना सोलापूर रोडवरील हॉटेल श्याम परिसरातून ताब्यात घेतले.

आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेले ३० हजार रुपये किमतीचे एक गावठी पिस्तूल, २० हजार रुपये किमतीचा सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर असा एकूण ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# परळीत बेकायदेशीर दारु साठ्यावर छापा

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथील पोलीस ठाणे संभाजीनगर हद्दीत बेकायदेशीर दारूसाठवणूक व विक्रीप्रकरणी पोलिसांनी धडक कारवाई करत मोठा दारूसाठा जप्त केला आहे. या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे परळी नगर परिषदेच्या सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार उर्वरित तीन प्रभागांतील मतदानाच्या पूर्वसंध्येला ही कारवाई करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे ८.४५ वाजता परळी वैजनाथ येथील हॉटेल आबासाहेब समोरील पत्र्याच्या शेडमध्ये आरोपी बेकायदेशीररीत्या विविध कंपन्यांची दारू साठवून ठेवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्या अनुषंगाने पोलीस उपनिरीक्षक संदीप उत्तमराव चव्हाण यांनी पथकासह छापा टाकून कारवाई केली.

या छाप्यात रॉयल स्टॅग, मॅकडॉल, ओल्ड बॉम्बे, इम्पेरियल ब्ल्यू, आयकॉनिक व्हाइट, आफ्टर डार्क ब्ल्यू, सखु संत्रा, टॅंगो पंच, रुस्तुम गोल्ड, मॅजिक मोमेंट्स आदी विविध कंपन्यांच्या दारूचे बॉक्स जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे दीड लाख रुपयांहून अधिक असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी पोलीस ठाणे संभाजीनगर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २५९/२०२५ अन्वये दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३४ वाजता ईश्वर रेशमाजी बहीरे (वय ३५, रा. कन्हेरवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. निवडणूक काळात अवैध दारूविक्री रोखण्यासाठी पोलिसांनी सतर्क राहून केलेली ही कारवाई नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे.

# लिंबागणेश वाणीवस्तीवर बिबट्याचा धडक हल्ला; शेळी ठार, परिसरात भीतीचे वातावरण

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील वाणीवस्ती परिसरात मध्यरात्री बिबट्याने घुसखोरी करत बाबुराव वाणी यांच्या गोठ्यातील एका शेळीवर हल्ला करून तिला ठार केल्याची घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण वाणीवस्ती तसेच आजूबाजूच्या परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

घटनेचा सविस्तर तपशील असा की, वाणीवस्ती येथील बाबुराव वाणी यांचे एकत्रित कुटुंब असून घरासमोर असलेल्या गोठ्यात गायी, म्हशी आणि शेळ्या बांधलेल्या होत्या. मध्यरात्री सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास गोठ्यात जनावरांची धडपड सुरू झाल्याने बाबुराव वाणी यांना जाग आली. त्यांनी बाहेर येऊन पाहिले असता काही जनावर पळताना दिसले.

बॅटरीच्या प्रकाशात पाहणी करत असताना एका शेळीचा नरडा तोडलेला असून मोठ्या प्रमाणात रक्त सांडलेले दिसले. याचवेळी बॅटरीच्या प्रकाशात समोरच बिबट्या उभा असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. प्रकाश पडताच बिबट्या तात्काळ पळून गेला.

या घटनेनंतर वाणीवस्ती व परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचा वावर असल्याच्या भीतीने अनेक ग्रामस्थांनी रात्र जागून काढली. लहान मुले, महिला व वृद्ध नागरिकांमध्ये विशेषतः भीती असून नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना अयोध्या वाणी म्हणाल्या,

आम्ही शेतात राहतो. आमच्या अंगणात लहान मुले खेळत असतात. कुटुंबातील पुरुष कामानिमित्त बाहेर जातात. रात्री बिबट्याने शेळी ठार केल्यामुळे आम्हाला मोठी भीती वाटत आहे. वनविभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा.

दरम्यान, वनविभागाने पिंजरे लावून तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे. गेल्या आठवड्यात लिंबागणेश परिसरात बिबट्या आढळून आल्यामुळे डॉ. ढवळे यांच्या मागणीनुसार वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांसोबत बैठक घेऊन जनजागृती केली होती.

डॉ. ढवळे यांनी पुढे सांगितले की, परिसरात ड्रोनद्वारे शोध मोहीम राबवावी, पिंजरे लावावेत, तसेच गस्त वाढवावी. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये यासाठी वनविभागाने तातडीने योग्य ती कार्यवाही करून सुरक्षिततेची हमी द्यावी.

## ज्येष्ठ पत्रकार नागनाथ वारद यांचे निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी



येथील जुन्या पिढीतील नागरिकांनी जेष्ठ पत्रकार नागनाथ आप्पा वारद यांचे आज रविवारी सायंकाळी दुःखद निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय ७० वर्ष होते

अंबाजोगाई शहरामध्ये सर्वपरिचित असलेले जेष्ठ पत्रकार म्हणून नागनाथ आप्पा वरद यांची ओळख आहे गेल्या अनेक वर्षापासून ते वृत्तपत्रात काम करतात एकमत तरुण भारत, चंपावतीपत्र, गावकरी, आदर्श गावकरी, लोकमंथन या दैनिकात त्यांनी अंबाजोगाई तालुका प्रतिनिधी म्हणून काम केले होते सध्याचे दैनिक लोकतंत्र चे तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत होते गेल्या तीन महिन्यापासून ते आजारी असल्याने एका जागेवर होते मात्र आज रविवारी त्यांचे दुःखद निधन झाले.

# पिंपळवंडी येथे जैन साध्वी कुसुमकवरजी म.सा व अरुणप्रभाजी म.सा यांचे जल्लोषात स्वागत

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे दि.१८ डिसेंबर गुरुवार रोजी जैन साध्वी परमपूज्य श्री कुसुमकवरजी म.सा व श्री.अरुणप्रभाजी म.सा यांचे पिंपळवंडी या ठिकाणी आगमन झाले.त्यांच्या स्वागतासाठी विलासशेठ पटवा व पटवा परिवाराने भव्य-दिव्य असा स्वागत सोहळा आयोजित केला होता.या भव्य-दिव्य स्वागताचे प्रमुख आकर्षण जि.प.कें.प्रा.शा.पिंपळवंडी शाळेच्या विद्यार्थ्यांचे लेझीम पथक व मुलीचे स्वागत गीत.शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात,घोषणा देत साध्वींचे स्वागत केले.त्यासोबतच जि. प. कें. प्रा. शा.पिंपळवंडी मध्ये जैन साध्वी कुसुमकवरजी म.सा व अरुणप्रभाजी म.सा यांचे दुपारच्या सत्रात व्याख्यान आयोजित केले.

यावेळी शाळेचे शिक्षक एस.आर.पवार पवार सर यांनी प्रास्ताविकात जैन साध्वी, संन्यास,त्यांचे जीवन यावर विद्यार्थ्यांना माहिती दिली.यावेळी बोलताना प्रथमतः अरुणप्रभाजी म.सा यांनी विद्यार्थी व शिक्षक व ग्रामस्थ यांनी केलेल्या स्वागतासाठी भरभरून कौतुक केले.विद्यार्थ्यांना गुरू शिष्य परंपरा,गुरुप्रती आपली कशी असावी यासंदर्भात छत्रपती शिवाजी महाराज यांची त्यांचे गुरू समर्थ रामदास यांच्याप्रती असलेल्या गुरू भक्तीसाठी शिवाजी महाराज राजसिंहासनाचा त्याग करायला तयार होते,संत जनाबाईची विठ्ठलाप्रती असलेली भक्ती मुळेच जनाबाई च्या प्रत्येक गवरीतून विठ्ठल



विठ्ठल असा आवाज येत होता, यासाह असे अनेक उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना बहुमोल असे मार्गदर्शन केले.

यानंतर रात्री पिंपळवंडी गावामध्ये आयोजित व्याख्यानमालेत पिंपळवंडी मध्ये जैन साध्वी परमपूज्य अरुणप्रभाजी म.सा यांनी गावातील ग्रामस्थांना हरवत चाललेली माणुसकी,मोबाईलचे व्यसन यावर अतिशय उत्कृष्ट व्याख्यान देत सर्व भाविकभक्तांना मंत्रमुग्ध केले.गावामध्ये दर १५ दिवसांनी भजन आयोजित करून त्यामध्ये सर्व ग्रामस्थांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने भाविक-भक्त उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार मानताना कु.समृद्धी विलास पटवा म्हणाल्या की,पिंपळवंडी हे गाव सर्व जाती धर्माच्या सर्व कार्यक्रमात मनापासून सहभागी होणारे गाव आहे.या गावामध्ये सर्व कार्यक्रम अतिशय उत्कृष्टपणे संपन्न होतात हे केवळ येथे असलेल्या एकीमुळेच.याप्रसंगी समृद्धी पटवा यांनी विशेष आभार जि.प.कें.प्रा.शा.पिंपळवंडी शाळेचा संपूर्ण स्टाफ.सर्व विद्यार्थी,सर्व ग्रामस्थ यांचे मानले.सर्वांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी पार पडला.

यावेळी कार्यक्रमासाठी जि. प. कें. प्रा.शा पिंपळवंडी शाळेचे मुख्याध्यापक शहाजी येवलेसर, केंद्रप्रमुख नारायण नरसाळेसर, बी.आर.पवारसर , एस. आर.पवार सर, लटपटेसर, नवले मॅडम, होळकर मॅडम सर्व विद्यार्थी, पिंपळवंडी ग्रामपंचायतचे उपसरपंच दादासाहेब पवार, प्रशांत पवार,राहुल पवार,पोपट शेळके,सोपान वाघमारे,संतोष वाघमारे,नरहरी वाघमारे,संदीप वाघमारे,संजय बेद्रे,श्रीकांत पवार, राजेंद्र पवार,बबन पवार,विशाल लांडे,सुंदरलाल बाफना,शोभाचंद नहार,सुयश कांकरिया,कांतीलाल गांधी,मदनलाल गांधी,राजीव गांधी बंटी मुनोत,ओम गांधी,सचिन बाफना, प्रफुल्ल बाफना,गौतम नहार,राहुल बाफना,चव्हाण ताई,इंदू काकू,शेख मॅडम,रेखा मोरे,लक्ष्मी पवार,राजामती पवार,सायरा सय्यद,मनिषा पवार,निर्मला पवार,सविता पवार, निलम वाघमारे,विघ्ने मॅडम,अनिता पवार,संजयमाला उकांडे,गीतांजली खटावकर,वर्षा पवार,नंदा खटावकर, पुष्पा शहाणे,मंदा खटावकर,संगीता खटावकर,हौसाबाई क्षीरसागर, वनिता क्षीरसागर,रोहिणी वाघमारे,लक्ष्मी वाघमारे,कोमल पवार, गायत्री बेद्रे,मंगल लांडे,बाफना काकीजी,सीमा गांधी,हेमा गांधी, कांकरिया काकीजी,सारिका बाफना,स्वाती बाफना,अंजली बाफना,प्रतिभा नहार,आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्वांचे मनःपूर्वक आभार पिंपळवंडीचे मा.उपसरपंच विलास पटवा, मा.ग्रा.सदस्या संगीता पटवा, ट्रेनी शिक्षिका समृद्धी पटवा यांनी मानले.

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी विश्वकर्मा ऑफसेट प्रिंटर्स, पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक- विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

PATODA SANCHAR Newspaper is published By Vilas Digambarrao Dolse,in front of Bus Stand, Patoda Dist. Beed, on behalf Vilas Digambarrao Dolse. edited by Vilas Digambarrao Dolse and printed by Vilas Digambarrao Dolse, Vishwakarma Offset Printers, Patoda (414204), Dist. Beed. (Beed Justice)

# संचार

जाहिर प्रगटन, कोर्टाची जाहिर नोटीस,
जन्म-मृत्युची नोंद, निविदा सुचना, ई टेंडर,
नावात बदल, वाढदिवस शुभेच्छा जाहिरात
तसेच इतर जाहिराती व बातम्या प्रसिध्दीसाठी
संपर्क करा

९४२३४७१८३३
७०२०६४२६९३




दै. संचार च्या अंकाची
पीडीएफ आपल्या
मोबाईलवर मिळविण्यासाठी
९४२३४७१८३३ या
मोबाईल नंबरवर मेसेज
करा किंवा क्यूआर कोड
स्कॅन करा